# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

-----------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०९ जुलै, २०२५ / आषाढ १८, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

-------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २८**

-------------------------------------------

### सांगली महानगरपालिकेत वीज बिलामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१) *२८३३ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली महानगरपालिकेतील वीज बिल गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी एसआयटी (SIT) नेमून दोन वर्ष झाली असूनही गैरव्यवहाराचा तपास अतिशय संथ गतीने सुरू असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिला आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली महानगरपालिकेने सन २०२० मध्ये पथदिव्यांच्या वीज बिलापोटी महावितरणला रुपये ९ कोटी ८८ लाख ६६ हजार १३३ रकमेचा धनादेश दिला असून रुपये ८ कोटी ८५ लाख ७० हजार रुपयांची वीज बिले भरण्यात आली आहेत तसेच उर्वरित रुपये १ कोटी २९ लाख ९५ हजारांची रक्कम खाजगी ग्राहकाच्या वीज बिलापोटी भरण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणने नेमलेल्या कंत्राटी कर्मचारी, वीज बिल भरणा केंद्रातील कर्मचारी, महानगरपालिका विद्युत विभागातील कर्मचारी यांच्या संगनमताने हा गैरव्यवहार झाला असून गत दोन वर्षापासून या गैरव्यवहाराच्या चौकशीकरीता एसआयटी स्थापन होऊन देखील चौकशी न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त चौकशीस दिरंगाई करणाऱ्या तसेच वीज बील गैरव्यवहारात दोषी असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

सांगली शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४४४/२०२० भा.दं.सं. कलम ४२०, ४०६, ४०९, ४६४, ४६७, ४७१, १२०(ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असून या गुन्ह्यामध्ये ११ आरोपी निष्पन्न करुन त्यांच्या विरोधात न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे.

सदर गुन्हाचा सी.आर.पी.सी. १७३ (८) प्रमाणे पुन्हा SIT च्या माध्यमातुन तपास करण्यात येत असून तपासाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने तसेच सर्व संबंधित कार्यालयातुन माहिती संकलित करणे, फॉरेन्सिक ऑडिट इत्यादी विस्तृत स्वरुपाचे काम असल्याने यास थोडा कालावधी अपेक्षित आहे.

सद्य:स्थितीत सदर गुन्ह्यातील फॉरेन्सिक ऑडिटचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर त्रिसदस्यीय SIT समितीच्या एकूण ५ मिटींग आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यामाध्यमातुन सखोल तपास सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

तत्कालीन कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी यांच्या दिनांक ०४/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेने वीज बिलापोटी भरलेल्या धनादेशामधील रकमेच्या अनुषंगाने महानगरपालिका ग्राहकांच्या व इतर ग्राहकांच्या खात्यामध्ये जमा रक्कम बाबतचे विवरणपत्र दिल्याचे दिसुन येते.

(३) तपासाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने तसेच सर्व संबंधित कार्यालयातुन माहिती संकलित करणे, फॉरेन्सिक ऑडिट इत्यादी विस्तृत स्वरुपाचे काम असल्याने यास थोडा कालावधी अपेक्षित आहे.

सद्य:स्थितीत सदर गुन्ह्यातील फॉरेन्सिक ऑडिटचे काम पूर्ण करण्यात आले असून त्रिसदस्यीय SIT समितीच्या एकूण ५ मिटींग आयोजित करुन सखोल तपास सुरु आहे. SIT चा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तात्काळ पुढील कार्यवाही प्रस्तावित करता येईल.

(४) सदर वीज बिल गैरव्यवहारातील दोषींवर वरिलप्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे तसेच एकूण ११ आरोपी निष्पन्न करुन त्यांच्या विरोधात न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे.

SIT चा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नव्याने निष्पन्न होणाऱ्या दोषींवर तात्काळ पुढील कायदेशीर कारवाई करण्याची तजविज आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नद्यांचे जल प्रदूषण रोखण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(२) * ३४७८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.शशिकांत शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १९०९ ला दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६०३ नद्यांपैकी ३११ नद्या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार प्रदूषित असून सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णा, वारणा आणि पंचगंगा नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात शहरातील सांडपाणी आणि औद्योगिक कचरा प्रक्रिया न करता सोडण्यात येत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ३९१ स्थानिक स्वराज्य संस्थाकडून ९७५८.५३ एमएलडी (दशलक्ष लिटर प्रतिदिन) इतक्या सांडपाण्याची निर्मिती होत असून, निर्माण होणाऱ्या ९७५८.५३ एमएलडी सांडपाण्यापैकी ७७४७.२४ एमएलडी सांडपाण्यावर शुदधीकरण प्रक्रीया केली जात असून उर्वरित सांडपाणी प्रक्रीयेविना नद्यामंध्ये सोडले जात असल्याने राज्यातील नद्यांचे जलप्रदूषण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील जल प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे व सनियंत्रण करण्याकरीता कार्यदल (Task Force) गठीत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जल प्रदूषण नियंत्रण मंडळाने गठित केलेल्या नदी पुनरुत्थान समितीमार्फत ५३ प्रदूषित नद्यांचे कृती आराखडे तयार करण्यात आले असून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नद्यांमधील पाण्याचा वापर शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जात असल्याने सदर कृती आराखड्यांच्या अंमलबजावणीसाठी तसेच जल प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करुन नद्यांचे प्रदूषण रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

- केंद्र शासनाच्या राष्ट्रीय जल गुणवत्ता मोजमाप योजनेनुसार (NWMP) देशामधील एकूण ६०३ नद्यांचे नियमितपणे सर्वेक्षण करण्यात येते. त्यानुसार केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०२२ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालामध्ये महाराष्ट्र राज्यातील ५६ प्रदूषित नदी पट्ट्यांचा समावेश करण्यात आला होता.
- प्रश्नाधीन विषयाबाबत कृष्णा नदीमध्ये एका कारखान्याव्दारे दूषित पाणी सोडले जात असलेबाबतची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाली होती. त्यानुसार सदर कारखान्यास दिनांक २५/०४/२०२५ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

- राज्यातील एकूण ४१९ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमधून निर्माण होणाऱ्या एकूण ९१९० द.ल. लि/दिन घरगुती सांडपाण्यापैकी ४९२८ द.ल.लि/दिन पाण्यावर प्रक्रिया करण्यात येते. उर्वरित ४२६२ द.ल.लि/दिन सांडपाणी प्रक्रियेविना नदीत मिसळते. तथापि, यासाठी सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे काम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाकडून प्रस्तावित आहे.

(३) राज्यातील जलप्रदूषण कमी करण्याकरीता व उपाययोजना करण्याकरीता कार्यदल (Task Force) गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) व (५) हे खरे आहे.

• नदी पुनरुत्थान समितीने ५३ प्रदूषित नद्यांचे कृती आराखडे तयार करुन केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर केले आहेत. सदर कृती आराखड्यांच्या अंमलबजावणीचे काम विविध विभागांमार्फत करण्यात येत आहे.

• जल प्रदुषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान दोषी आढळून आलेल्या व संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन करत असल्यास सदर उद्योगांवर नियमांनुसार वेळोवेळी आवश्यक ती कारवाई करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## न्हावा शेवा, उरण (जि.रायगड) येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट या बंदरात येत असलेल्या जहाजांमुळे मासेमारी क्षेत्राचे नुकसान होत असल्याबाबत

**(३) * २५४३ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्हावा शेवा, उरण (जि.रायगड) येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (JNPT) या बंदरात मोठ्या प्रमाणावर जहाजांची सतत ये-जा होत असून आजूबाजूच्या सुमारे २६ चौरस किलोमीटर परिसरात तेलगळतीसह जलप्रदूषण होत असल्यामुळे स्थानिक मच्छीमारांच्या मासेमारी क्षेत्राचे व पारंपरिक पध्दतीने टाकण्यात येणाऱ्या जाळ्यांचेही नुकसान होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छीमार बांधवांचे नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

• सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड-अलिबाग यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (JNPT) बंदरातील चॅनेल हे मासेमारी क्षेत्र नसल्याने सदर चॅनेलमध्ये मासेमारी करण्यास व पारंपारीक पध्दतीने जाळी टाकण्यासाठी बंदी करण्यात आली आहे.

• सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड-अलिबाग व जवाहरलाल नेहरू पतन प्राधिकरण यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार प्रश्नाधीन विषयाबाबतची तक्रार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(२) जवाहरलाल नेहरू पतन प्राधिकरणामार्फ़त प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (JNPT) व मुंबई बंदर येथील तेलगळती रोखण्यासाठीची व्यवस्था जवाहर व्दीप येथे उभारण्यात आली आहे. तसेच किरकोळ तेलगळती रोखणे, तरंगता कचरा गोळा करणे याकरीता प्रदूषण नियंत्रण उपकरणांनी सुसज्ज बहुउद्देशीय उपयुक्तता लाँच (एमपीयूएल) तैनात करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उध्दवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(४) * २५१७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात ९ हजार ८४ कारखाने सक्रिय असून, गत वर्षभरात १ हजार ८८० कारखाने रेड झोनमध्ये आले असून तसेच या कारखान्यांमध्ये विविध कारणांमुळे अपघातांच्या घटना घडत असल्याने यामध्ये काम करणाऱ्या गरीब कामगारांचा नाहक बळी जात असल्याची व नागरिकांच्या आरोग्याची समस्या निर्माण झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारखान्यांचा प्रदूषण निर्देशांक ६० पेक्षा अधिक असल्याची गंभीर बाब तसेच धोकादायक असलेल्या रेड झोनसह नारिंगी, हिरवा, पांढऱ्या झोनमधील नऊ हजार ८४ कारखान्यांची नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धोकादायक असलेल्या रेड झोनसह नारिंगी, हिरवा, पांढऱ्या झोनमधील कारखान्यांमुळे जल तसेच वायू प्रदुषणाच्या संकटांना समोरे जावे लागणार असून याबाबत कोणतीही उपाययोजना कारखान्यांच्या व्यवस्थापनाकडून करण्यात आली नसल्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने रेड झोनमधील कारखान्यांवर कारवाई करून कामगारांना सुरक्षा पुरविण्याबाबत व येथील प्रदूषण रोखण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

तथापि, जिल्हा आरोग्य अधिकारी, ठाणे व नवी मुंबई यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्याबाबतची तक्रार कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(२) अंशत: खरे आहे.

रेड झोनसह नारिंगी, हिरवा, पांढऱ्या झोनमधील एकूण ७४३७ कारखान्यांची नोंद झाली आहे.

(३) हे खरे नाही.

कारखान्यांनी औद्योगिक सांडपाण्यावर प्राथमिक, द्वितीय व तृतीय प्रक्रिया संयंत्रे बसविण्यात आली असून प्रक्रियाकृत सांडपाण्याचा बागायतीसाठी वापर केला जातो. वायु प्रदूषण नियंत्रणासाठी डस्ट कलेक्टर, स्क्रबर यंत्रणा बसविल्या आहेत.

(४)

(i) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभाग यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार ठाणे जिल्हयातील कारखान्यांमध्ये घडलेल्या अपघातांची चौकशी करण्यात आली असून मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात एकूण १६ फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच विशेष बाब म्हणून कारखान्यांचे सूरक्षिततेच्या दृष्टीकोनातून निरिक्षण करून दोषी कारखान्यांवर मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात एकूण ९० खटले दाखल करण्यात आले आहेत.

(ii) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमतीपत्रातील अटी व शर्तींचे उल्लंघन केलेल्या उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, उत्पादन बंद, प्रस्तावित आदेश, अंतरिम आदेश व बंद आदेश दिले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुसेगांव (ता.खटाव, जि.सातारा) आणि पंचक्रोशीतील गावांमध्ये अवैधरित्या मद्यविक्री सुरु असल्याबाबत

**(५) * २३०२ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसेगांव (ता.खटाव, जि.सातारा) आणि पंचक्रोशीतील बहुतेक गावांमध्ये आर्थिक तडजोडीतून सर्रासपणे अवैधरित्या मद्यविक्री सुरु असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध व्यवसायास राजकीय पाठबळ असलेल्या व्यक्तीकडून प्रोत्साहन दिले जात असून तरुणांना सदर अवैध व्यवसाय करण्यास भाग पाडून त्यांच्याकडून चुकीचे उद्योगधंदे करुन घेतले जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याविरोधात वक्तव्य केल्यास किंवा तक्रार केल्यास विरोधातील लोकांना मारहाण करणे, लोकांना वाळीत टाकणे, त्यांच्या शेतात काम करणाऱ्या शेत मजुरांना दमदाटी करुन दबाब आणला जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार केलास त्याची दखल घेण्यास ठाणे अंमलदार आणि विभागीय पोलीस अधिकारी जाणिवपूर्वक दुर्लक्ष करित असून सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाही, हे खरे नाही.

तथापि, पुसेगांव पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अवैध धंद्यांबाबत गोपनिय माहितीच्या आधारे वेळोवेळी छापे टाकुन कारवाई करण्यात आली आहे.

माहे मे, २०२५ अखेर अवैध धंद्यांवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| | एकूण गुन्हे | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|
| दारुबंदी | २२ | रुपये २१,१०५/- |
| जुगार | ७ | रुपये ४३,४२३/- |

(२) व (३) नाही, हे खरे नाही.

माहे मे, २०२५ मध्ये पुसेगांव, पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात अशा प्रकारचे गुन्हे अथवा तक्रारी दाखल नाही.

(४) स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास येणारे प्रत्येक व्यक्तीच्या तक्रारीची दखल घेवून तक्रारदारांच्या सांगण्याप्रमाणे दखलपात्र किंवा अदखलपात्र गुन्हे दाखल करण्यात येत आहे.

तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कोरेगांव येथे येणाऱ्या तक्रारदारांचे तक्रारींचे निरसन करुन संबंधित पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकारी यांना योग्य कारवाई करण्याबाबतच्या सुचना दिल्या जात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबधंक विभागाने केलेल्या कारवाईबाबत

**(६) * २८०६ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमधील बाजार परवाना विभागाच्या दोन अधिकाऱ्यांना लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबधंक विभागाकडून रंगेहाथ पकडण्यात आले असून दोन अधिकाऱ्यांपैकी फक्त एकास अटक करण्यात आली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन आरोपींपैकी एकाच आरोपीला अटक करण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) आरोपी लोकसेवक लिपिक, बाजार व परवाना विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण (वर्ग-३) यांनी तक्रारदार यांचे नावे असलेले मटन विक्री व कटाईचे लायसन्स हे त्यांचे मित्र यांचे नावावर करण्यासाठी सदर कामाची कागदपत्रे स्विकृत करून काम करून देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे स्वतः करीता व वरिष्ठ अधिकारी यांचेकरीता रुपये १,५०,०००/- लाचेची मागणी केली होती. या संदर्भात केलेल्या सापळा कारवाई दरम्यान आ.लो.से. यांनी सदर लाचेची रक्कम स्विकारली. सदर प्रकरणी इतर लोकसेवक यांचा सहभाग निष्पन्न न झाल्याने केवळ आ.लो.से. यांच्याविरुध्द बाजारपेठ पोलीस स्टेशन गु.र.नं. ११८/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) कलम ७ व ७ (अ) प्रमाणे दिनांक ०१/०२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे, ही बाब खरी आहे.
(२) सदर गुन्ह्यात आ.लो.से. यांच्या व्यतिरिक्त इतर लोकसेवक यांचा सहभाग आढळून न आल्याने एका आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे.
(३) सदर गुन्ह्याचा सखोल तपास करण्यात येत आहे. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या दिनांक ०३/०२/२०२५ च्या आदेशान्वये आरोपी लोकसेवकास अटकेच्या म्हणजेच दिनांक ०१/०२/२०२५ पासून शासन सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी बंदीवासात असल्याबाबत

**(७) * २४७२ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मध्यवर्ती कारागृह, जिल्हा कारागृह वर्ग एक, दोन व तीन अशा सर्व कारागृहांमध्ये बंदी ठेवण्याच्या एकूण उपलब्ध क्षमतेपेक्षा १५ हजार ९४६ कैदी बंदीवासात असून मुंबई मध्यवर्ती कारागृहात ९९९ कैदी ठेवण्याची क्षमता असताना प्रत्यक्षात ३३६१ कैदी ठेवण्यात आल्यामुळे पुरेशी जागा व सोयीसुविधेच्या अभावी शिक्षा भोगत असून, क्षमतेपेक्षा अधिक कैदी असल्याने अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एकूण ६४ कारागृहांमध्ये ४१ हजार ०७० कैदी असून यामध्ये ४१ हजार कैद्यांपैकी २३ हजार ४८९ कैदी अशिक्षीत किंवा अल्पशिक्षीत आहेत व काही "अंडरट्रायल" कैद्याचांही समावेश आहे तसेच १८ ते ३० वयोगटातील कोवळया कैदयांना आवश्यक शिक्षण व सामाजिक जनजागृती निर्माण होण्याबाबत शासनाने कारागृहामध्येच काही उपक्रम राबविण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी आढावा घेऊन कारागृहातील कैदयांची होणारी कोंडी व समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील मध्यवर्ती कारागृह, जिल्हा कारागृह वर्ग एक, दोन व तीन अशा सर्व कारागृहांची एकूण बंदी क्षमता २७ हजार १८४ इतकी असून माहे मे, २०२५ अखेर एकूण ३९ हजार ५२७ इतके बंदी बंदीस्त होते. त्यानुसार कारागृहांमध्ये उपलब्ध बंदीक्षमतेपेक्षा १२३४३ बंदी अधिक आहेत.

मुंबई मध्यवर्ती कारागृहाची अधिकृत बंदीक्षमता ९९९ इतकी असून माहे मे, २०२५ अखेरीस सदर कारागृहात ३२६८ बंदी बंदीस्त आहेत. बंदी संख्येमध्ये लक्षणीय वाढ झालेली असली तरी, कारागृह प्रशासनाकडून बंद्यांना मूलभूत सोयी सुविधा पुरविण्याकरीता आवश्यक उपाययोजना करण्यात येतात. त्यानुसार सर्व बंदी उपलब्ध सवलतींचा नियमितपणे लाभ घेत आहेत. बंद्यांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी यासाठी प्रशासनामार्फत ई-मुलाखत, स्मार्टकार्ड दूरध्वनी, ई-किऑस्क, व्हिडीओ कॉन्फरन्सिंग, टीव्ही, पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर कुलर विथ प्युरिफायर, वॉशिंग मशिन्स इ सुविधादेखील उपलब्ध करुन दिल्या आहेत.

(२) राज्यातील एकूण ६० कारागृहांमध्ये माहे मे, २०२५ अखेर ३९५२७ बंदी बंदीस्त होते. त्यापैकी सध्या ६००३ बंदी अशिक्षित असून त्यामध्ये ५०६७ न्यायाधीन (Undertrial) बंद्यांचा समावेश आहे. सर्व बंद्यांसाठी विशेषत: १८ ते ३० वयोगटातील बंद्यांकरीता राज्यातील सर्व कारागृहांमध्ये आवश्यक शिक्षण व सामाजिक जनजागृती निर्माण होण्याकरीता शासनामार्फत तसेच सेवाभावी संस्थांच्या मदतीने विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये उच्च शिक्षण, विविध शैक्षणिक उपक्रम, इतर व्यावसायिक शिक्षण व

प्रशिक्षण, प्रौढ शिक्षण, सामाजिक जागृतीकरीता खेळ व मनोरंजन, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक कार्यक्रम, योग व ध्यानधारणा यांचा समावेश होतो. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक व इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेमार्फत पदवी अभ्यासक्रम तसेच अल्प मुदतीचे व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आले आहेत. तसेच बंद्यांचे पुनर्वसन व कल्याणाकरीता शासनाने समता फाऊंडेशन, अझीम प्रेमजी फिलॉन्थ्रॉपीक ट्रस्ट आणि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस या सेवाभावी संस्थांसोबत करारदेखील केले आहेत.

(३) कारागृहातील कैद्यांची होणारी कोंडी व समस्या सोडविण्याकरीता राज्यामध्ये नवीन कारागृह बांधणे, प्रस्तावित नवीन कारागृहांकरीता जागा उपलब्ध करुन घेणे, अस्तित्वातील कारागृहांची नवीन बॅरेक्स बांधून बंदीक्षमता वाढविणे इ. उपाययोजना करण्यात येत आहेत. नवीन कारागृह बांधकामे व अस्तित्वातील कारागृहात अतिरीक्त बॅरेक्सची बांधकामे पूर्ण झाल्यानंतर आगामी कालावधीत राज्यातील कारागृहांची अधिकृत बंदी क्षमता एकूण १७११० ने वाढणार आहे. “Support to Poor Prisoners” या योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल बंद्यांना दंड/जामिनाची रक्कम भरण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. याशिवाय, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व सेवाभावी संस्थांच्या मदतीने मोफत कायदेशीर सहाय्य पुरविण्यात येते.

मुंबई परिसरामध्ये नवीन कारागृह निर्मितीसाठी जागा संपादन करण्याचे काम सुरु असून त्या अनुषंगाने संबंधितांशी पत्रव्यवहारदेखील करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या कारागृहांमध्ये विस्तारीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पहाडी गोरेगाव (मुंबई) परिसरातील तिवरांच्या झाडांची तोड करुन अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(८) * २३०७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पहाडी गोरेगाव परिसरातील भागात तिवर (कांदळवन) वृक्षांची अनधिकृतरित्या तोड करून त्या ठिकाणी वाहन दुरुस्ती केंद्र उभारण्यात आले असून परिसरात विविध ठिकाणी अनधिकृतरित्या भराव टाकण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदळवन संरक्षण व संवर्धन नियमांनुसार कांदळवनापासून किमान ५० मीटर अंतरापर्यंत कोणतीही विकासकामे करण्यास सक्त मनाई असतानाही संबंधित परिसरात नियमांचे उल्लंघन करून जुन्या तुटलेल्या लाद्यांच्या सहाय्याने भराव टाकण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पहाडी गोरेगाव परिसरातील कांदळवनाची तोड करून व जमिनीवर भराव टाकून अनधिकृत अतिक्रमण केल्या प्रकरणी दोषी व्यक्ती वा संस्था यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ (१) व (२) अन्वये बांगुरनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे संबंधिताविरुध्द दिनांक १६/०४/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच कांदळवनालगत असलेल्या अनधिकृत वाहन दुरुस्ती गॅरेजचे बांधकाम काढून टाकण्यासंदर्भात संबंधितांना मुंबई महानगर पालिकेकडून, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५५ अन्वये दिनांक २३/०६/२०२५ रोजी नोटीस देण्यात आली असून सदर अनधिकृत बांधकाम १५ दिवसात काढण्याची सुचना केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यात राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या लिपिक टंकलेखक भरती प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(९) * ३०५५ श्री.एकनाथराव खडसे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळातील लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या पदोन्नतीत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याने कामगार सेनेचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे तक्रार केली असून, सदर प्रकरणी दोषीवर कारवाई न झाल्यास दिनांक १० मे, २०२५ पासून उपोषणास बसणार असल्याचे निवेदन भ्रष्टाचार निवारण समितीकडून दिनांक १ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळात भरती प्रक्रिया ही विभाग नियंत्रक यांच्या देखरेखीत झाली असल्याने सदर गैरव्यवहारास विभाग नियंत्रक जबाबदार असून, त्यांची तात्काळ बदली अथवा निलंबित करून चौकशी करण्याची मागणी पदाधिकाऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने दोषीवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी रा. प. महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता खाते यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. त्याबाबतचा चौकशी अहवाल प्राप्त असून अहवालात नमूद विभाग नियंत्रक यांचेवर प्रमादिय कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील वेरूळ-अजिंठा आंतरराष्ट्रीय कला महोत्सव निधीअभावी रद्द करण्यात आल्याबाबत

**(१०) * २४४२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील पर्यटन वाढीस चालना देण्यासाठी दरवर्षी आयोजित केला जाणारा वेरूळ-अजिंठा आंतरराष्ट्रीय कला महोत्सव यावर्षी निधीअभावी रद्द करण्यात आला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाकडून एक कोटी व पर्यटन संचालनालयाकडून ५० लाख रुपये निधी देण्याबाबत आश्वासन देण्यात आले होते, तसेच उर्वरित निधीसाठी शासन व खासगी कंपन्यांच्या सीएसआर निधीची मागणी करूनही निधी उपलब्ध झाला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गतवर्षीच्या महोत्सवाच्या आयोजनासाठी करण्यात आलेल्या खर्चाच्या सुमारे पावणेदोन कोटी रुपयांच्या थकित देयकांची अद्यापही पूर्तता करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर महोत्सव पुन्हा नियमित स्वरूपात आयोजित करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देवून थकित देयके अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.
(३) सन २०२३-२४ च्या वार्षिक कृती पणन आराखड्यामध्ये वेरूळ-अजिंठा महोत्सवा करीता रुपये १०.०० लक्ष निधीची तरतूद करण्यात आली होती. तथापि, पर्यटन विभागाच्या दिनांक १४/०२/२०२४ च्या पत्रान्वये वेरुळ-अजिंठा महोत्सव पर्यटन संचालनालय व जिल्हाधिकारी, छ.संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात मान्यता देऊन त्यासाठी पर्यटन विभागामार्फत रुपये ५०.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला.

जिल्हाधिकारी, छ.संभाजीनगर यांनी दिनांक ११/१२/२०२४ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीस अनुसरून पर्यटन संचालनालयामार्फत दिनांक १३/०१/२०२५ च्या पत्रान्वये सदर महोत्सवासाठी, रुपये १.७७ कोटी इतका निधी कार्योत्तर उपलब्ध करून देण्याच्या प्रस्ताव विभागास सादर करण्यात आला होता.तथापि, पर्यटन विभाग, शासन निर्णय दिनांक ०७/०१/२०१९ मधील अ.क्र.४ (७) नुसार "कोणत्याही परिस्थितीमध्ये/कोणत्याही कारणास्तव कोणत्याही कार्यक्रमाचे प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी सादर केले जाणार नाही" अशी तरतूद असल्याने सदर मागणी पर्यटन विभागाच्या दिनांक २२/०१/२०२५ च्या पत्रान्वये अमान्य करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ऑनलाईन जुगार ॲप्सच्या प्रोत्साहनपर जाहिरातींवर बंदी घालण्याबाबत

**(११) * २७७१ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) येथे एका १६ वर्षीय युवकाला ऑनलाईन गेमिंगचे व्यसन जडल्याने त्याने राहत्या इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून उडी टाकून आत्महत्या केल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोशल मीडियाचा वापर खूप मोठ्या प्रमाणात केला जात असून राज्यात जुगार ॲप्सच्या जाहिराती प्रसिध्द व्यक्तींकडून मोठ्या प्रमाणात केल्या जात असल्याने या जाहिरातींमुळे युवकांमध्ये व्यसनाधिनता, आर्थिक नुकसान व आत्महत्या यासारखे गंभीर परिणाम दिसून येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन जुगार खेळण्याचा व्यसनामुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याने राज्यात या ऑनलाईन जुगार ॲप्स तसेच जुगार ॲप्सची जाहिरात करण्यावर बंदी आणून युवकांना जुगाराच्या व्यसनापासून मुक्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

किवळे(ता.हवेली, जि.पुणे) येथील एका युवकाने राहत्या इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून उडी टाकून आत्महत्या केल्याने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत पोलीस स्टेशन, रावेत येथे मयत खबर क्र. ३२/२०२४, भा.न्या.सं. कलम १९४ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) होय.

आर्थिक हव्यासापोटी व जाहिरातबाजीला बळी पडून युवकवर्ग ऑनलाईन गेमींग कडे आकर्षित होत आहे.

ऑनलाईन गेम मुळे नाशिक ग्रामीण येथे सन २०२१ मध्ये १ आत्महत्या, गोंदिया येथे सन २०२३ मध्ये १ आत्महत्या, पिंपरी-चिंचवड येथे सन २०२४ मध्ये १ आत्महत्या व धाराशिव जिल्ह्यात सन २०२५ मध्ये २ हत्या व १ आत्महत्येबाबत गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

तसेच, ऑनलाईन गेम मुळे आर्थिक फसवणूक झाल्याने नवी मुंबई येथे सन २०२५ मध्ये १ व नाशिक ग्रामीण येथे सन २०२२-२०२५ या कालावधीत एकूण ११ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

(३) ऑनलाईन जुगारास आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सायबर कार्यालयामार्फत समाजमाध्यमांवरून तसेच प्रत्यक्षात सायबर जनजागृती कार्यक्रम राबवून जनजागृती करण्यात येते. सन २०१७-२०१९ या कालावधीत राज्यातील एकूण ३,२५३ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सायबर गुन्ह्यांबाबत आधुनिक पध्दतीचे अन्वेषण आणि तपासाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

ऑनलाईन गेम बंद करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे विशेष कायदे अस्तित्वात नाहीत. तथापि, ऑनलाईन गेमवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गत Information Technology (Intermediary Guidelines and Digital Media Ethics Code) Rules, २०२१, दिनांक ०६/०४/२०२३ रोजी भारतीय राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

ऑनलाईन लॉटरी व ऑनलाईन गेम्स यांचे विनियमन करण्यासाठी कायदा करण्याबाबत राज्य शासनाच्या वतीने केंद्र शासनास विनंती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

----------------

## बदलापूर (जि.ठाणे) येथे नवजात बालकांची खरेदी-विक्री सुरु असल्याबाबत

**(१२) * २५८१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथे नवजात बालकांची खरेदी-विक्री सुरु असल्याप्रकरणी पोलिसांनी एका २४ वर्षीय व्यक्तीला अटक केली असल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेत पोलिसांनी विक्रेत्याचा मोबाईल तपासला असता व्हॉटसॲप वरील संदेशात नवजात बालकांचे छायाचित्र आणि त्यावर रुपये पाच ते सात लाखांपर्यंतचा दर लिहीला असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणातील संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) आणि (३) होय, हे अंशत: खरे आहे.

बदलापूर (प.), ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथे एका इसमाने त्याच्या मोबाईलमध्ये इंटरनेटव्दारे व्हॉटसअप या सोशल मिडीयाचा वापर करून काही नवजात बालकांचे फोटो व व्हिडीओ तसेच त्यांच्या किंमतीसंबधी व्यवहार केल्याचा संदेश/चॅट्स दिसुन आले असल्याने बदलापूर (प.) पोलीस ठाणे येथे दिनांक ०४/०४/२०२५ रोजी गु. र. क्र. १३५/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ मध्ये कलम १४३(१), १४३(२), १४३(३), १४३(४), १४३(५), ६२, सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ६६ (ड), ६६ (क), सह अल्पवयीन न्याय मुलांची काळजी व संरक्षण कायदा, २०१५ मधील कलम ८१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीला अटक करुन त्याच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील लॉयड्स मेटल्स प्रा. ली. कंपनीच्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याबाबत

**(१३) * ३४६२ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुग्गुस (जि.चंद्रपूर) येथील लॉयड्स मेटल्स प्रा. ली. कंपनीमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे उसरगाव, घुग्गुस व इतर परिसरातील शेती खराब होत असून शेतीतील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून या कंपनीतून बाहेर पडणाऱ्या प्रदूषित धुराचा त्रास होऊन परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदुषणामुळे येथील गरोदर माता, लहान मुलांना खोकला, दमा,श्वसनाचे विकार तसेच कॅन्सरसारखे गंभीर रोग होत असून मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (NGT) या कंपनीला संपूर्ण नवीन सुविधा बसविण्याबाबत निर्देश दिलेले असतानाही सदर कंपनीने अद्यापि कुठलीही दक्षता घेतलेली नसून प्रदूषण नियंत्रणासाठी कामे करणाऱ्या निरी या संस्थेकडून प्राधिकृत वैज्ञानिक श्री.जॉर्ज, राहुल व्यवहारे व एमपीसीबीच्या एसआरओ हेमा देशपांडे, शंकर केडुले यांची सदर कंपनीची पाहणी करण्याकरीता नियुक्ती करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीची पाहणी करून प्रकल्प पूर्णपणे बंद करून या कंपनीमध्ये नव्या मशिनरी बसविण्यात येऊन सदर अहवालानुसार हा प्रकल्प नव्या स्वरूपात सुरु करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले असूनही याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांच्याकडून अद्याप या कंपनीवर कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांच्या आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने सदर कंपनीवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार प्रश्नाधिन परिसरात होणाऱ्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्याबाबतची तक्रार त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

जिल्हा कृषी अधिकारी, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार प्रदुषणामुळे शेतकऱ्यांच्या शेतजमिनी व पिकांचे नुकसान होत असल्याबाबतची लेखी तक्रार स्थानिक शेतकऱ्यांकडून कृषी विभागास प्राप्त झालेली नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांच्या दिनांक १६/०५/२०१४ रोजीच्या आदेशास अनुसरुन लॉयड्स मेटल्स प्रा. ली. कंपनीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत निर्देश देण्यात आले होते. सदर निर्देशांचे अनुपालन तपासण्याकरीता निरी व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली होती.

(३) हे खरे नाही.

निरी व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांच्या नियुक्त समितीने सादर केलेल्या अहवालानुसार सदर उद्योगास दिनांक ०७/०२/२०१८रोजी उद्योग बंदचे निर्देश दिले व तदनंतर सदर उद्योगाने सादर केलेल्या अनुपालन अहवालानुसार मंडळाने दिनांक २२/०२/२०१८ रोजी अटी व शर्तींसह उद्योग सुरु करण्याचे आदेश दिले व रुपये ५.०० लक्ष बॅंकहमी जप्त केली.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगास संमतीपत्रातील अटी व शर्तींच्या त्रुटींच्या अनुषंगाने दिनांक ४/०८/२०२२ रोजी कारणे दाखवा नोटिस व दिनांक २६/०६/२०२४ रोजी प्रस्तावित निर्देश दिले असून तद्नंतर सदर उद्योगास दिनांक २०/०५/२०२५ रोजी अंतरिम निर्देश दिले व रुपये १०.०० लक्ष बॅंक हमी घेण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आळंदा (ता.बार्शिटाकळी, जि.अकोला) येथील शेतकरी महिलेच्या शेतामध्ये मंजूर कृषी पंप आस्थापित न केल्याबाबत

**(१४) * ३३२९ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदा (ता.बार्शिटाकळी, जि.अकोला) येथील "मागेल त्याला सौर कृषी पंप" या योजनेंतर्गत श्रीमती कुसुम लक्ष्मणराव इंगळे या शेतकरी महिलेस माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये सौर कृषी पंप मंजूर झालेला असतानाही शेतामध्ये पंप आस्थापित न झाल्यामुळे प्रकल्प व्यवस्थापक, महाऊर्जा जिल्हा कार्यालय, अकोला यांच्याकडे ई-मेल द्वारे दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदन सादर केले असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे सौर पंप बसवून देण्याबाबत महावितरण, निमोचित मुख्य व्यवस्थापकीय संचालक यांना कारवाई करण्याचे मा.राज्यमंत्री, ऊर्जा यांनी दिनांक ११/३/२०२५ रोजी निर्देश दिले असून जी.के एनर्जी मार्केटस प्रा. ली. पुणे या कंपनीचे प्रतिनिधी तसेच महावितरणचे शाखा अभियंता व महाऊर्जाचे जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक यांचेशी वारंवार संपर्क करून देखील कृषी पंप शेतात प्रस्थापित करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सौर कृषी पंप शेती प्रस्थापित करण्याबाबत व संबंधित प्रकरणी विलंब केल्या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

सदरचे निवेदन दिनांक ३०/०६/२०२५ रोजी महाऊर्जा जिल्हा कार्यालय, अकोला यांना ईमेल-दवारे प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे नाही. श्रीमती कुसुम लक्ष्मणराव इंगळे, आळंदा (ता.बार्शिटाकळी, जि.अकोला) यांनी दिनांक १४/०६/२०२४ ला अर्ज केला असून दिनांक २४/०७/२०२४ रोजी लाभार्थी हिस्सा भरणा केला व तद्नंतर जी.के एनर्जी मार्केटर्स प्रा. लि. या पूरवठादाराची निवड केली. दिनांक ०४/०२/२०२५ च्या संयुक्त सर्वेक्षण अहवाल मंजूरीनंतर पंप आस्थापित करण्यासाठी कार्यादेश देण्यात आला असून, त्यानुसार दिनांक १५/०५/२०२५ रोजी श्रीम. इंगळे यांच्या शेतामध्ये पंप आस्थापित करण्यात आला आहे.

(३) संयुक्त सर्वेक्षण अहवाल विलंबाबाबत उपकार्यकारी अभियंता, बार्शी टाकळी उपविभाग व उपकार्यकारी अभियंता, अकोला परिमंडळ यांच्यावर दिनांक ३०/०६/२०२५ अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही सुरु केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धर्मादाय विश्वस्थ संस्था अधिनियमांतर्गत नोंदणी केलेल्या शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करणेबाबत

**(१५) * ३२१४ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धर्मादाय विश्वस्थ संस्था अधिनियमांतर्गत नोंदणी केलेल्या व कोणतीही शैक्षणिक फी न घेणाऱ्या मराठी, उर्दू व हिंदी शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्याबाबत शासन विचाराधीन असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यासाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. बहुवर्षीय वीजदर विनियमानुसार एकूण महसूलाची गरज व त्याप्रमाणात वीजदर ठरवून मिळावेत याकरीता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे वितरण कंपनीतर्फे प्रस्ताव सादर केला जातो. या प्रस्तावाची मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून पडताळणी झाल्यानंतर वर्तमानपत्रात जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात येते. तद्नंतर मा.आयोगाकडून राज्यातील महसूली मुख्यालयांच्या ठिकाणी जाहीर सुनावणी घेण्यात येते. ग्राहकांनी उपस्थीत केलेल्या सूचना/हरकती/अभिप्राय विचारात घेऊनच व संपूर्ण नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा.आयोगातर्फे वीज दराबाबत निर्णय घेण्यात येतो. तसेच, वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांची वर्गवारी निश्चित करण्याचे अधिकार देखील वीज नियामक आयोगास प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसारच महावितरण कंपनीकडून वर्गवारी निहाय वीज दराची आकारणी करण्यात येते.

मा.आयोगाचा दिनांक २५/०६/२०२५ रोजीच्या पुर्नविलोकन याचिकेमधील आदेशानुसार (प्र.क्र. ७५/२०२५) शासकीय शाळा व महाविद्यालये यांना सार्वजनिक सेवा (शासकीय) तसेच, गैर शासकीय शाळा व महाविद्यालये यांना सार्वजनिक सेवा (इतर) या वर्गवारीतील दराने वीज आकारणी करण्याबाबत मंजुरी देण्यात आली आहे. सार्वजनिक सेवा (इतर) या वर्गवारीतील सर्व ग्राहकांना टप्प्या-टप्प्याने ३% वीजदरात कपात मंजूर केली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वीज ग्राहकांना वीज दरामध्ये सवलत देण्याबाबत

**(१६) * २३९० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वीज ग्राहकांना दरमाह २०० युनिटपर्यंतची वीज स्वस्त दरात देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी केलेली असूनही राज्यातील ग्राहकांचा वीजेचा वापर १०० युनिटखाली असताना वीज कंपन्यांचे खाजगीकरण, वितरक कंपन्यांची वाढती थकबाकी व शासनाच्या निधीअभावी घोषणांची अंमलबजावणी होत नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरमाह वीज बिलात वाढ होत असल्याने सर्वसामान्य व गरीब ग्राहकांना आर्थिक भार सहन करावा लागत असून थकीत वीज बिलांमुळे वीज तोडणीचा धोका वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री वा ऊर्जा विभागाने जाहीर केलेल्या सवलतींच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत व सवलतीपासून वंचित लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने १-१०० युनिट वापर करणाऱ्या घरगुती वर्गवारीतील ग्राहकांचे सरासरी वीज दरात आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंत १०.२०% ते २६.२९% पर्यंतची घट मंजूर केली आहे. तसेच १०१-३०० युनिट वापर करणाऱ्या घरगुती वर्गवारीतील ग्राहकांचे सरासरी वीजदरात आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंत ०.४५% ते ४.६१% पर्यंतची घट मंजूर केली आहे.

मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या आदेशान्वये मंजूर वीज दर दिनांक ०१ जुलै, २०२५ पासून लागू करण्यात येणार आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हाजीअली (मुंबई) येथील 'एसआरसीसी चिल्ड्रेन रुग्णालय आणि थेरपी सेंटर' या धर्मादाय रुग्णालयांकडून नियमांची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(१७)** * **२२६९ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत असलेल्या हाजीअली, मुंबई येथील 'एसआरसीसी चिल्ड्रेन रुग्णालय आणि थेरपी सेंटर' या रुग्णालयाकडून गरीब व आर्थिक दुर्बल घटकांतील रुग्णांवर मोफत अथवा सवलतीच्या दरात उपचार करण्यास टाळाटाळ करित असल्याची बाब दिनांक ११ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने सन २००४ मध्ये दिलेल्या निकालानुसार धर्मादाय रुग्णालयांसाठी आखून देण्यात आलेल्या योजनेनुसार सदरहू रुग्णालय काम करित नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आणि धर्मादाय रुग्णालयांसाठी आखून दिलेल्या नियमांची अंमलबजावणी होत नसल्याबाबत सदरहू रुग्णालय प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सदरहू रुग्णालयाकडून गरीब व आर्थिक घटकातील रुग्णांवर मोफत अथवा सवलतीच्या दरात उपचार करण्यास टाळाटाळ करीत असल्याबाबतची तक्रार दिनांक ११ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास धर्मादाय आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

नमुद प्रश्नासंदर्भात चौकशी करण्याकरीता निरीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृह्नमुंबई यांनी एस.आर.सी.सी. रुग्णालयास चौकशीकामी दिनांक २०/०६/२०२५ रोजी भेट दिली. निरीक्षकाने केलेल्या चौकशी दरम्यान सदर रुग्णालयात निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णासाठी राखीव खाटांबाबतची माहिती बोर्डवर अद्ययावत केल्याचे दिसून आले.

तसेच निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी माननीय उच्च न्यायालयाने तयार केलेल्या योजनेची माहिती रुग्णालयाच्या दर्शनी भागात लावल्याचे दिसून आले.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## राज्यातील कृषी पंपाच्या वीज बिलांच्या थकबाकीबाबत

**(१८) * २३६३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषीपंपाच्या वीज बिलांची थकबाकीची रक्कम मागील नऊ महिन्यांपासून वीज देयकांमध्ये दर्शविली नसल्यामुळे सुमारे ७५ हजार कोटी रूपयांची रक्कम वसूल करता येणार नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसातून फक्त ४ ते ५ तास वीज मिळत असल्यामुळे त्यांच्या पिकाचे नुकसान होत असून आर्थिक अडचणीमुळे शेतकऱ्यांनी वीज देयकाची थकबाकी वेळेवर न भरल्यामुळे तसेच महावितरणने मागील नऊ महिन्यांपासूनची थकबाकीची मागणी न केल्यामुळे केंद्रीय वीज कायद्यातील तरतुदीनुसार शेतकऱ्यांकडून थकबाकी मागणे शक्य नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शेतकरी कधी कोरडा दुष्काळ, अतिवृष्टी तर कधी ओला दुष्काळ यामध्ये भरडला जात असल्याने शेतकरी थकीत वीज देयके भरु शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांची मागील नऊ महिन्यांची वीजेची थकीत देयके माफ करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सर्व कृषी पंप ग्राहकांच्या वीज देयकांमध्ये वीज बिलांची थकबाकी दर्शविण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही,

वीज भार व्यवस्थापन करण्यासाठी तसेच कृषी पंपांसाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील ग्राहकाना रात्रीच्या काळात ८ तास किंवा दिवसा ८ तास थ्री फेज वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येते. तसेच तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे अशा कृषी वाहिन्यांवर दिवसा वीज पुरवठा करण्याच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. कृषी पंप ग्राहकांच्या माहे मार्च-२०२४ च्या वीज देयकामध्ये थकबाकी दाखवली असल्यामुळे सदर थकबाकी मागणे शक्य असून ग्राहकाने सदरची थकबाकी भरणे क्रमप्राप्त आहे.

(३) व (४) शासन निर्णय, दिनांक २५/०७/२०२४ नुसार एप्रिल २०२४ पासून मोफत वीज देण्यासाठी "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४" योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेचा कालावधी मार्च-२०२९ पर्यंत आहे. सदर योजनेंतर्गत राज्यातील ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या लघुदाब कृषी ग्राहकांना माहे एप्रिल-२०२४ पासून मोफत वीज देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) येथील रबर टायर पायरॉलिसिस कंपन्यांच्या कामाचा पंचनामा करून कारवाई करण्याबाबत

**(१९) * ३५७२ श्री.संजय केणेकर, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) येथील उसर, दिनकरपाडा, वडवली, बिलोशी, पालसई, सापना, किरवली, नेहरोली, कोन, तोरणे कोनसाई या गावांमध्ये ६० हून अधिक रबर टायर पायरॉलिसिसचे कारखाने असून, सदर कारखान्यांकडून हवेत मिसळणारे कार्बन फाइन रोखण्यासाठी आवश्यक स्क्रबर व प्रदूषण नियंत्रण यंत्रणेचा वापर केला जात नसल्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शेतकरी व ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित सर्व कारखान्यांची तपासणी करून योग्य कारवाई करण्याचे निर्देश मा.पालकमंत्री महोदयांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्देशाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

तथापि, जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांचेकडून दिनांक २७/०६/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार कारखान्यांच्या वायू प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याची समस्या असलेले रुग्ण आढळून आलेले नाहीत.
(२) हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उद्योगांच्या पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने २९ टायर पायरॉलिसिस उद्योगांना उत्पादन बंदचे आदेश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळास गतवर्षीच्या तुलनेत उत्पन्नामध्ये कमी वाढ झाल्याबाबत

**(२०) * ३६७० श्री.संजय खोडके, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाने १५ टक्के भाडेवाढ करुनही गतवर्षीच्या तुलनेत माहे एप्रिल महिन्यामध्ये ३३ कोटी ६५ लाख इतके उत्पन्न अपेक्षित असताना केवळ २९ कोटी ८० लाख उत्पन्न महामंडळास प्राप्त झाले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये जिल्हानिहाय मार्च-एप्रिल, २०२५ मधील महामंडळाचे उत्पन्न पाहता राज्य मार्ग परिवहन महामंडळास गतवर्षीपेक्षा अधिक तोटा झाला असून सदरहू तोटा होण्याची कारणे काय आहेत तसेच सदरची भाडेवाढ प्रवाशांना परवडणारी नसल्याने प्रवाशांमध्ये नाराजी पसरली असून, सदर भाडेवाढ कमी करण्याबाबत प्रवाशांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने आढावा घेऊन राज्य मार्ग परिवहन महामंडळ बसेसच्या प्रवाशी भाड्यांचे दर कमी करण्याबाबत व राज्य परिवहन महामंडळ नफ्यात आणण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) नाही.

(२) एप्रिल, २०२४ च्या तुलनेत एप्रिल, २०२५ मध्ये तोटा कमी झालेला आहे.भाडेवाढ कमी करणेबाबत प्रवाशी संघटनांकडून मागणी होत आहे.

(३) व (४) रा.प.महामंडळ बसेसच्या तिकीटावर करण्यात आलेली भाडेवाढ योग्य आहे.

रा.प.महामंडळाच्या उत्पन्नात वाढ करणेसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- रा.प.महामंडळाचे उत्पन्नात वाढ करणेसाठी महामंडळाकडून सर्व आगार / विभागांना दैनंदिन उत्पन्नाचे उद्दिष्ट देण्यात आले असून उद्दिष्ट पूर्ती साठी विभागांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
- चालक / वाहक यांना कामगिरीनिहाय उत्पन्नांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.
- रा.प.महामंडळाच्या स्वमालकीच्या २६४० नवीन साध्या बसेस दाखल होत आहेत. यापैकी १७२७ बसेस प्राप्त झाल्या असून, सदर बसेस प्रवासी प्रतिसाद चांगला असणाऱ्या मार्गांवर चालविण्यात येत आहेत.

रा.प.महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीने शाळा/महाविद्यालये येथे आगारांमार्फत रा.प. कर्मचारी पाठवून विद्यार्थ्यांना मासिक पासेस वितरण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

रा.प.बसेसमधून पार्सल-कुरिअर वाहतूक उत्पन्नामध्ये वाढ करणे, जाहिरात माध्यमातून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात वाढ करणे, हॉटेल-मोटेल पासून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात वाढ करणे याकरीता प्रयत्न करण्यात येत आहे.

-----------------

## नागपूर येथे सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग या क्षेत्रामध्ये युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२१) * ४१०३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मधील सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग माहिती तंत्रज्ञान (आयटी आणि आयटीईएस) मध्ये डिजिटल पायाभूत सुविधा आणि वैद्यकीय उपकरणे उपदान यासारख्या महत्त्वाच्या वाढीच्या क्षेत्रांमध्ये सहा कंपन्यांनी विशेष आर्थिक क्षेत्रात ८.५ एकर जागा विकत घेतली असून यामुळे प्रादेशिक आर्थिक उपक्रमाला गती व सहाय्यक उद्योगांना चालना मिळून येथील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूरचे जिल्हाधिकारी आणि महाराष्ट्र विमानतळ विकास लिमिटेडचे एमआयडीसी सह व्यवस्थापक यांनी दिलेल्या एका माहितीनुसार आयटी डिजिटल पायाभूत सुविधा आणि भविष्यातील उत्पादनासाठी राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वपूर्ण नोड म्हणून मिहान सेझ वेगाने उदयास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एमएसएमईमधील गुंतवणुकीचा ओघ जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा, सिंगल विंडो क्लीअरन्स आणि धोरणात्मक स्थितीद्वारे समर्पित उद्योग समर्थ इकोसिस्टीम प्रदान करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मिहानमध्ये येणाऱ्या उद्योगांना तसेच एमएसएमईमधील गुंतवणुकीचा ओघ वाढवण्याकरीता व त्यांची कामे सुलभरित्या होण्याचे दृष्टीने सिंगल विंडो क्लीअरन्सची सुविधा प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच पायाभूत सुविधांमध्ये दोन-चार-सहा पदरी रस्ते, पथदिवे, मलनि:स्सारण वाहिनी. फुटपाथ, स्वच्छ पाणीपुरवठा आणि कमीत कमी वीजदर या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत तसेच समर्पित उद्योग समर्थ इकोसिस्टीम प्रदान करण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्रात उद्योगांना वस्तु व सेवा कर सुट, आयात- निर्यात करात सुट यासारखे उद्योग पुरक धोरण अवलंबविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेतकऱ्यांच्या शेतमाल वाहतुकीसाठीच्या वाहनांवर कारवाई करण्यात येत असल्याबाबत

**(२२)** * **३८९० श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक शेतकरी आपला शेतमाल स्थानिक बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी स्वतःच्या वाहनांद्वारे विविध ठिकाणी नेत असतात, परंतु शेतमालाचा पाच-दहा किलो अधिक भार असल्याचे सांगून शेतकऱ्यांच्या वाहनांना परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दंड आकारण्यात येत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना थोड्याशा अतिरिक्त शेतमालासाठी वेगळी वाहतूक व्यवस्था करणे, परवडणारे नसून व शेतमाला योग्य दर मिळत नसल्यामुळे तसेच परिवहन अधिकारी विनाकारण दंड आकारीत असल्याने व खूप वेळ गाडी थांबवून शेतकऱ्याला नाहक त्रास देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल बाजारपेठांमध्ये नेण्यासाठी वापरणाऱ्यात येणाऱ्या खासगी वाहनांना शिथिलता देण्यात यावी व त्यासंदर्भात आर.टी.ओ. अधिकाऱ्यांना सूचना देऊन शेतकऱ्यांच्या या समस्याचे कायमस्वरूपी निवारण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) नाही.

(३) शासन निर्णय क्रमांक एमव्हीडी-१२०८ / प्र.क्र.१६/परि-४, दिनांक २५/०३/२००८ नुसार प्रपत्र - क (१) मध्ये शेती कामाशी संबंधित वाहने उदा. ट्रॅक्टर, ट्रॉली यांना सीमा तपासणी नाक्यांवरील कर वसूलीतून वगळण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या दिनांक ०७/०१/२०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ११३ (३) ची अंमलबजावणी करीत असताना निर्धारित वजनक्षमतेच्या ५ टक्के इतकी सुट परिवहन वाहनांना देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील महसूल विभागाकडून सेवा केंद्राच्या वितरणामध्ये गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(२३) * २३०० श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **माहिती तंत्रज्ञान मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात महसूल विभागाकडून सेवा केंद्रांचे वितरण सुरू करण्यात आले असून, सदर सेवा केंद्रांसाठी अर्ज मागविण्याची प्रक्रिया ही ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत असून या प्रक्रियेमध्ये काही अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा व तालुका पातळीवर दलाल सक्रिय हस्तक्षेप करित असून सेवा केंद्र मिळवून देण्यासाठी २५,००० ते ५०,००० रुपये इतका आर्थिक मोबदला घेत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून सातारा जिल्ह्यात महसूल विभागाकडून सेवा केंद्रांच्या वितरणातील गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही, सातारा जिल्ह्यात महसूल विभागाकडून सेवा केंद्रांचे वितरण सुरू करण्यात आले असून सदर सेवा केंद्रासाठी अर्ज मागविण्याची प्रक्रिया ही ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार केल्याच्या लेखी तक्रारी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई मधील सायन कोळीवाडा येथील कंपनीमुळे वायू प्रदूषण होत असल्याबाबत

**(२४) * २८४५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील सायन कोळीवाडा परिसरातील वडाळा ट्रक टर्मिनल येथे "देव आर.एम.सी.एल. एल.बी.","एन सी सी नागार्जुन","अशोका बिल्डकॉन","प्रोकॉर्न","ईगल इन्फ्रास्ट्रक्चर" व इतर आर.एम.सी.प्लांट हे एम.एम.आर.डी.ए च्या भूखंडावर असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आर.एम.सी. प्लांट मुळे सदर परिसरात मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होत असून परिसरातील वडाळा आर.टी.ओ कार्यालय, स्थानिक पोलीस स्थानक यासारखी अनेक शासकीय कार्यालये, रहिवाशी संस्था असून तेथील कार्यरत कर्मचारी व स्थानिक रहिवाशी यांना प्रदूषणामुळे श्वसनाचा त्रास व आजार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर.एम.सी. प्लांट पैकी मे. ईगल इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने एम.एम.आर.डी.ए चा अतिरिक्त भूखंड अनधिकृतपणे बळकविला असून महावीर या कंपनीने परस्पर दुसऱ्या कंपनीला आर.एम.सी. प्लांट साठी जागा दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंपन्या ह्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या नियमांचे उल्लंघन करुन विभागात मोठ्या प्रमाणात प्रदूषण करित असून, सदर आर.एम.सी. प्लांट हे बेकायदेशीरपणे येथील जागेचा वापर खाजगी कामाकरीता करित आहेत व रेडिमिक्सचा पुरवठा मुंबईतील इतर भागात करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अशोका या कंपनीचा आर.एम.सी.प्लांट हा भक्तीपार्क येथील निवासी जागेत असल्यामुळे स्थानिक रहिवाशांना होत असलेला त्रास रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे उल्लंघन करून विभागात मोठ्या प्रमाणात प्रदूषण करित असलेल्या आर.एम.सी. प्लांटवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

के.ई.एम रूग्णालय, मुंबई यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार माहे मे, २०२५ पर्यंत दमा, खोकला यांसारख्या श्वसन विकारात लक्षणीय वाढ झालेली दिसून येत नाही.

(३) अंशत: खरे आहे.

मे. ईगल इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. या ठेकेदारामार्फत अतिरिक्त जमीन अनाधिकृतपणे वापरण्यात येत असून सदर अनाधिकृत क्षेत्रासाठी व्यवसायिक दराने भाडे व व्याज एम.एम.आर.डी.ए प्राधिकरणास भरण्याबाबत मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांना कळविण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) मे. अशोका कंपनीचा आर.एम.सी.प्लांट दिनांक १६/०७/२०२४ रोजी बंद करण्यात आला असून सद्य :स्थिती प्रकल्प निष्कासित केला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य राखीव पोलीस दलात महिलांना संधी देणेबाबत

**(२५) * २५१० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लाखो युवक/युवती पोलीस व राखीव दलातील भरतीसाठी दरवर्षी प्रयत्न करीत असतात परंतु फॉर्म भरण्यासाठी एकाच जिल्ह्याचा पर्याय असून भरतीसाठी अधिक उमेदवारांचे अर्ज प्राप्त होत असल्याने भरती प्रक्रिया राबविताना प्रशासनाला नियोजन करणे अवघड जाते तसेच उमेदवारांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस दलात महासंचालक आणि पोलीस अधीक्षक यासारख्या वरिष्ठ पदांवर महिलांची संख्या तुरळक असून पोलीस भरतीमध्ये मुलांच्या बरोबरीने मुली देखील चांगल्या पध्दतीने काम करित असताना तसेच भारतीय सैन्य दलात महिला यशस्वी होत असतानाही राज्य राखीव पोलीस दलातील भरती प्रक्रीयेत मुलींना संधी दिली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस भरती प्रकीयेसाठी उमेदवारांना एकापेक्षा जास्त जिल्ह्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्यास संधी देण्याबाबत तसेच राज्य राखीव पोलीस दलात मुलींनादेखील संधी देण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेवून राज्यातील पोलीस दलात वरिष्ठ पदावर महिलांचे प्रतिनिधीत्व वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र राज्य पोलीस व राज्य राखीव पोलीस बलातील पोलीस शिपाई भरतीकरीता एका उमेदवाराला एका पदासाठी एकाच घटकात अर्ज दाखल करण्याची संधी दिली जाते. उमेदवारांना एकापेक्षा जास्त घटकांमध्ये अर्ज दाखल करण्याचा पर्याय दिल्यास सदर उमेदवारांची त्यांनी अर्ज दाखल केलेल्या प्रत्येक घटकामध्ये मैदानी चाचणी घ्यावी लागेल व एकूणच मैदाणी चाचणीची कार्यवाही पूर्ण होण्यास विलंब होईल.

सद्य:स्थितीत एका पदासाठी एकाच घटकामध्ये अर्ज दाखल करण्याचा पर्याय असल्याने मैदानी चाचणी घेण्यास विलंब होत नाही व त्यामुळे भरती प्रक्रिया सुनियोजित व विहित वेळेत पूर्ण करणे शक्य होते. भरती प्रक्रियेमधील उमेदवारांना कोणत्याही स्थानिक गैरसोयींना सामोरे जावे लागत नाही.
(२) गृह विभाग, शासन निर्णय दिनांक १५/१०/२०२४ अन्वये राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.०४, नागपूर येथे राज्य राखीव पोलीस बलाचा महिलांचा गट/कंपनी निर्माण करण्यास व त्याकरीता १४४ नवीन नियमीत पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये दारु व गांजाची अवैधरित्या विक्री होत असल्याबाबत

**(२६) * २४३८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील विश्रांतीनगर भागामध्ये ८ ते १० दुकांनात अवैधरित्या दारु व गांजाची विक्री होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुंडलिकनगर पोलीस स्थानकाच्या काही अंतरावरच रात्री उशिरापर्यंत अवैधरित्या सुरू असलेल्या दुकांनातील अवैध दारु विक्रीमुळे या परिसरात राहणाऱ्या महिला व लहान मुलांना नाहक त्रास सहन करावा लागत असून याबाबत पोलीस स्थानकात नागरिकांनी तक्रारी करुनही अवैधरित्या दारु विक्री करणाऱ्या दुकानांवर पोलिसांकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर शहरातील विश्रांतीनगर भागामध्ये सुरु असलेल्या अवैध दारु व गांजा विक्रीची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने अवैध दारु व गांजा विक्री करणाऱ्या दुकानांवर कारवाई तसेच दुकान मालकांवर गुन्हा दाखल करुन या अवैध दारु विक्रीकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरातील विश्रांतीनगर भागातील पोलीस स्टेशन, पुंडलीकनगर कार्यक्षेत्रात अवैधरित्या दारु विक्री होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे. तथापि, या भागात गांजा विक्री होत असल्याचे निदर्शनास आलेले नाहीत तसेच गांजा विक्रीबाबत नागरिकांकडुन अथवा इतर माध्यमातुन कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) छत्रपती संभाजीनगर शहरातील विश्रांतीनगर भागातील पोलीस स्टेशन, पुंडलीकनगर येथे अवैध दारु व गांजा विक्रीबाबत स्थानिक नागरिकांकडुन कोणतीही तक्रार अथवा तक्रार अर्ज प्राप्त झालेले नाहीत. तथापि, गोपनिय बातमीदारांकडुन मिळालेल्या खात्रीलायक माहितीच्या अनुषंगाने तपास करुन चौकशीअंती अवैध दारु विक्री करण्याऱ्या एकूण १० ईसमांविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ख) अन्वये गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) छत्रपती संभाजीनगर शहरातील विश्रांतीनगर भागातील सुरु असलेल्या अवैध दारु विक्रीची पोलीस प्रशासनाकडुन चौकशी करुन दोषींविरुध्द गुन्हे दाखल करुन वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) विलंब नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून प्रवाशांच्या तिकिटांवर ‘साफसफाई शुल्क’ घेण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२७) * २३५१ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळातील बसस्थानक व बसगाड्यांच्या साफसफाईसाठी होणारा खर्च प्रवाशांच्या तिकिटांवर ‘साफसफाई शुल्क’ स्वरूपात घेण्याबाबतचा प्रस्ताव महामंडळ प्रशासनाकडून वाहतूक विभागाकडे सादर केला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आर्थिक अडचणी सोडविण्याच्या प्रक्रियेमध्ये थेट प्रवाशांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकण्यात येत असल्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांचे आर्थिक शोषण होण्याची शक्यता असून साफसफाईसारख्या मूलभूत सेवा पुरविण्यासाठी त्याची जबाबदारी थेट खासगी संस्थांकडे देण्यात येत असल्यामुळे सार्वजनिक सेवांचा दर्जा, पारदर्शकता व उत्तरदायित्व यावर प्रश्न निर्माण होणार असून भविष्यात गैरव्यवहार व प्रशासकीय अपारदर्शकता वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवाशांकडून आकारण्यात येणाऱ्या 'साफसफाई शुल्का'च्या प्रस्तावाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्वसामान्य प्रवाशांवरील आर्थिक भार न वाढवता पर्यायी उपाययोजना राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर प्रस्तावावर अद्यापपर्यंत अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

-----------------

## धनदा कार्पोरेशन कंपनीच्या मालकीचे हॉटेल VITS लिलाव प्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(२८)** * **३१६६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील 'धनदा कॉर्पोरेशन लिमिटेड' या कंपनीच्या मालकीच्या VITS हॉटेलचे सन २०१२ च्या अधिकृत मूल्यांकन अहवालानुसार बाजारमूल्य सुमारे रुपये ११० कोटी इतके असूनही सदर हॉटेलचा MPID कायद्यांतर्गत अत्यल्प किंमतीस म्हणजेच रुपये ७६ कोटी एवढ्या किंमतीस काही भागधारक व उपविभागीय अधिकारी यांच्या संगनमताने दबाव टाकून लिलाव करण्याचा प्रयत्न केल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हॉटेल व्यवसायामधून ६ कोटी रुपये नफा मा.न्यायालयात जमा असताना कंपनीचे BSE लिस्टिंग शुल्क, कर्मचारी पगार व इतर प्रशासकीय खर्च प्रलंबित ठेवून मा.न्यायालयाचे कोणतेही निर्देश नसताना हॉटेल बंद केल्यामुळे सुमारे १५० कामगार व असंख्य छोटे व्यावसायिक आर्थिक संकटात सापडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारच्या शेअर्स व्यवहारासंबंधी प्रकरणांवर महाराष्ट्र संरक्षण गुंतवणूकदार कायदा (MPID) लागू होणार नाही असे तोंडी निरीक्षण नोंदविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धनदा कॉर्पोरेशन लिमिटेडच्या मालकीच्या VITS हॉटेलची बाजारमुल्याच्या तुलनेत कमी किंमतीस लिलाव करण्याचा प्रयत्न करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत तसेच या प्रकरणामुळे प्रभावित झालेल्या ५००० हून अधिक भागधारक व १५० हून अधिक कामगार व इतर व्यावसायिकांना आर्थिक मदत वा न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सन २०१८ मध्ये मा.विशेष न्यायालय (एमपीआयडी ॲक्ट) यांनी पारित केलेल्या निर्णयानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ‘धनदा कॉर्पोरेशन लिमिटेड’ या कंपनीच्या मालकीचे VITS हॉटेल जप्त करण्यात आले आहे. मा.विशेष न्यायालय यांनी सदर मालमत्ता लिलाव करुन रक्कम न्यायालयात जमा करण्याचे आदेशित केले आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०३/११/२०१८ रोजी सदर हॉटेल शासनाच्या ताब्यात घेण्यात आले आहे. परिणामी सन २०१२ चे मुल्यांकनाबाबत अधिकृत माहिती नाही.

मा.विशेष न्यायालयाचे आदेशानुसार लिलाव प्रक्रिया पूर्ण करण्याकरीता शासकीय नोंदणीकृत मुल्यमापक यांच्याकडून डिसेंबर, २०१८ मध्ये मिळालेल्या मुल्यांकन अहवालानुसार सदर हॉटेलचे वाजवी बाजारमूल्य साधारणत: रुपये ७५.९२ कोटी व प्राप्त करण्यायोग्य मूल्य रुपये ६४.५३ कोटी आहे. सदरच्या मुल्यांकनानुसार वेळोवेळी ई-लिलाव प्रक्रिया राबविण्यात आली. परंतु, देकारदारांचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे विक्री प्रक्रिया पूर्ण करता आली नाही. मा.विशेष न्यायालयाने दिनांक २२/०८/२०२२ च्या आदेशात नमूद करुन हॉटेलची किंमत कमीत कमी रुपये ६४.५३ कोटी इतकी निश्चित केली. तद्नंतर पुन्हा ई-लिलाव प्रक्रिया राबविण्यात आली, परंतु ई-लिलाव प्रक्रियेत कोणत्याही देकारदार यांचा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे संबंधित भागधारक व शेअरधारक यांनी सदर मालमत्तेचे दोन भाग असून त्यांचे मूल्यांकन यापूर्वीच करण्यात आलेले आहे, त्याप्रमाणे ई-लिलाव प्रक्रिया राबविल्यास इच्छूक देकारदार यांचेमार्फत ई-लिलाव पध्दतीने विक्री प्रक्रिया पूर्ण करण्यात येवून प्राप्त होणाऱ्या रकमेपैकी भागधारक यांचा भाग मोबदला देणे सोयीस्कर होईल, असा अर्ज मा.विशेष न्यायालयात सादर केला. तसेच उपविभागीय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर तथा सक्षम प्राधिकारी यांच्या कार्यालयामार्फत मा.न्यायालयात सदर जप्त करण्यात आलेल्या व्यावसायिक संस्थेची आधारभूत किंमत कमी करणेसाठी विहीत पध्दतीने अर्ज सादर केला असता, मा.न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या दिनांक २२/०८/२०२२ रोजीच्या आदेशाचे अवलोकन करुन पुढील कार्यवाही पूर्ण करणेबाबत निर्देशित केले आहे. मा.न्यायालयाच्या आदेशाचे अधिन राहूनच शासनाचे अधिकृत संकेतस्थळावर दिनांक ३०/०४/२०२५ रोजी आणि दैनिक वर्तमानपत्रात दिनांक ०२/०५/२०२५ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. सबब जप्त मालमत्तेची रुपये ६४ कोटी किंमत ही मा.विशेष न्यायालयाच्या आदेशानुसार ठरविण्यात आलेली आहे.

(२) मा.न्यायालयाचे निर्देशानुसारच सन २०१८ पासून सदरची व्यावसायिक संस्था (हॉटेल विट्स) ही मे. व्हिटीजन्स, द ग्रुप ऑफ हॉटेल, मुंबई आणि धनदा कॉर्पोरेशन यांचे व्यवस्थापनामार्फत दिनांक ३१/०१/२०२५ पर्यंत व्यावसायिक स्वरूपात कार्यरत होती. तथापि, आर्थिक व्यवहारात अनियमितता केल्याप्रकरणी आरोप असलेल्या व्यावसायिक संस्थेच्या नावे आर्थिक व्यवहार चालु असल्याची बाब स्पेशल एमपीआयडी केस क्र.०४/२०१६ अन्वये दाखल प्रकरणात मा.न्यायालयाचे वेळोवेळी निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने मा.न्यायालयाने कार्यरत असलेले व्यवस्थापन बदलण्याचे निर्देश दिलेले आहेत. यास्तव सदरची व्यावसायिक संस्था उपविभागीय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर तथा सक्षम प्राधिकारी कार्यालयाचे दिनांक ०६/०१/२०२५ रोजीचे पत्रकानुसार दिनांक ०१/०२/२०२५ पासून पुढील आदेशपावेतो बंद करण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अंतर्गत कलम ०७ चे पोटकलम (४) अन्वये जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेचा लिलाव करून लिलावापोटी प्राप्त होणाऱ्या रक्कम मा.न्यायालयामार्फत भागधारक यांना समन्याय वाटपाकरीता आवश्यक

कार्यवाहीस्तव तरतूद नमुद आहे. हॉटेल व्यवस्थापनावर होणारे आरोप आणि मा.न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या सुचना यांचा विचार करून हॉटेल व्यवसाय बंद करण्यात आला आहे. तसेच हॉटेल बंद करण्याबाबतची सुचना उपविभागीय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर तथा सक्षम प्राधिकारी कार्यालयाने दिनांक १८/०१/२०२५ रोजी मा.न्यायालयाला दिलेली आहे आणि मा.न्यायालयाने त्यावर कोणताही आक्षेप घेतलेला नाही.

(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी मा.विशेष न्यायालयाचे आदेश कोणत्याही न्यायालयाने रद्द केलेले नाहीत.

(४) महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये 'धनदा कॉर्पोरेशन लिमिटेड' या कंपनीच्या मालमत्ता शासन राजपत्र गृह विभाग दिनांक ०७/०५/२०१६ आणि दिनांक ०८/०६/२०१७ अन्वये जप्त करण्यात आल्या आहेत. एमपीआयडी कायद्यान्वये मा.विशेष न्यायालयाच्या निर्देशानुसार सक्षम प्राधिकारी यांच्यामार्फत मालमत्ता विक्रीबाबत व गुंतवणूकदार यांना त्यांचे गुंतवणुकीची रक्कम परत मिळवून देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

व्यवस्थापनामार्फत हॉटेलच्या नियुक्त सर्व कर्मचारी यांना दिनांक ३१/०१/२०२५ रोजीपर्यंतचे सर्व मासिक मानधन व तद्नुषंगिक अदा करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.